सकाळ अॅग्रोवन ५
शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६




मुंबई : 'मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत कृषी व्यवसाय पायाभूत सुविधा गुंतवणूक परिषदेचे उद्‌घाटन बुधवारी (ता. १६) पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. या वेळी उपस्थित मान्यवर.

# 'मॅग्नेट २.०'मधून एक हजार कोटींची गुंतवणूक होणार

## रावल : मॅग्नेट कृषी व्यवसाय पायाभूत गुंतवणूक परिषदचे उद्‌घाटन

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्याला केवळ कृषी उत्पादन करणारे राज्य न ठेवता कृषी मालाचे मूल्यवर्धन, प्रक्रिया आणि निर्यात करणारे आघाडीचे राज्य बनविण्यासाठी 'मॅग्नेट २.०'च्या माध्यमातून आधुनिक कृषी पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. केळी, डाळिंब, आंबा, लिंबूवर्गीय फळे, काजू आणि हळद या सहा कृषी उत्पादन समूहांसाठी एक हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीची संधी निर्माण केली जाणार आहे. खासगी क्षेत्राने या प्रक्रियेत भागीदार म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन पणनमंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले.

मुंबई येथे बुधवारी (ता. १६) आयोजित मॅग्नेट कृषी व्यवसाय पायाभूत सुविधा गुंतवणूक परिषदेचे उद्‌घाटन मंत्री रावल यांच्या हस्ते झाले. या वेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक आमदार चरणसिंह ठाकूर, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, प्रवासी भारतीय व्यवहार व जनसंपर्क विभागाचे सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे, पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक तथा 'मॅग्नेट' प्रकल्प संचालक विनायक कोकरे, आशियायी विकास बँकेचे संचालक ताकेशी उएडा, क्रिशन रौतेला, विविध देशांचे वाणिज्यदूत उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, "मॅग्नेटच्या पहिल्या टप्प्यात पायाभूत सुविधा व मूल्यसाखळी मजबूत करण्यासाठी उल्लेखनीय काम झाले आहे. दुसऱ्या टप्प्यात एकात्मिक पायाभूत सुविधांवर भर देण्यात येणार आहे. 'मॅग्नेट २.०'साठी एकूण २५ कोटी अमेरिकी डॉलर निधी असून, यासाठी आशियायी विकास बँक आणि महाराष्ट्र शासनाचे सहकार्य आहे.